# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
## कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर
**५३९,कसबा करवीर राजेंद्र नगर कोल्हापूर- ४१६ ००४**


**परीक्षा प्राधान्य / महत्वाचे**

क्र.कोविमं/१२वी/प्रात्यक्षिक/ 1061
कोल्हापूर-४१६००४
दिनांक-१३/०७/२०२२

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

**विषयः- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जुलै/ऑगस्ट २०२२ प्रात्यक्षिक/ तोंडी/ श्रेणी परीक्षेचे साहित्य स्विकारणे व जमा करणेबाबत.**

**संदर्भः-** क्र.कोविमं/१२ वी. प्रात्य./तोंडी परीक्षा/ जुलै /ऑगस्ट २०२२/१०६०दिनांक१३/०७/२०२२

उपरोक्त विषयाचे संदर्भीय परिपत्रक मंडळाच्या संकेत स्थळावर टाकलेले आहे कृपया अवलोकित व्हावे. प्रात्यक्षिक तोंडी अंतर्गत मुल्यमापन परीक्षेचे गुण ओएमआर गुणतक्त्यामध्ये नोंदविण्यासाठी ओएमआर पध्दतीचे गुणतक्ते, श्रेणीतक्ते (ग्रेडलिस्ट) व प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेच्या उत्तरपत्रिका व अनुषंगिक साहित्य सोमवार दिनांक **१८ /०७/२०२२** रोजी सकाळी १०.०० ते ४.०० या वेळेत आपल्या वितरण केंद्रावर वाटप करण्यात येणार आहे.

उपरोक्त साहित्य स्विकारण्यासाठी आपला प्रतिनिधी आपल्या सही शिक्क्यानिशी अधिकार पत्र घेवून संबंधित वितरण केंद्रावर वेळेत पाठविण्यात यावा. साहित्य स्विकारण्यास येणाऱ्या प्रतिनिधींनी साहित्य आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयाचे असल्याचे खात्री करुन स्विकारावे व ओएमआर पध्दतीचे गुंणतक्ते, श्रेणीतक्ते यापूर्वी कळविलेल्या तारखेस दिनांक **१०/०८/२०२२** रोजी सकाळी १०.०० ते ४.०० या वेळेत आपल्या वितरण केंद्रावर जमा करण्यात यावेत.

(पोवार डी. एस.)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर